Email - Info@maharashtracrimetimes.com

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, पुणे, सातारा, रत्नागिरी

R.N.I. No. MAHMAR/2010/33301

● वर्ष : ९ ● अंक: १० ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार ५ जून २०१८ ते सोमवार ११ जून २०१८

मूल्य २/- रुपये

Website:maharashatracrimetimes.com Email-maharashtracrimetimes33301@gmail.com POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2017-2019

3 | मासेमारी नौका मुदतीआधीच किनाऱ्याला

नवविवाहितेनंच केला पतीचा खून, काय आहे रहस्य? | 4

# सरकारची नियत नाही, शेतकऱ्यांनो टोकाची भूमिका घ्या -शरद पवार



**मुंबई (विशाल कारंडे)**- 'एक शेतकरी म्हणून माझा शेतकरी संपाला पाठिंबा आहे. समाजाने शेतकरी संपाला पाठिंबा द्यावा. सरकारने शेतकऱ्यांना दिलेली आश्वासनं पाळली नाहीत. तशी त्यांची नियत दिसत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी याबाबत टोकाची भूमिका घ्यावी' असं आवाहन माजी केंद्रीय कृषिमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केलं.

ते मुंबईत बोलत होते. यावेळी पवारांनी शेतकऱ्यांना रस्त्यावर दूध न ओतण्याचंही आवाहन केलं.'माझी विनंती आहे, आंदोलनात रस्त्यावर दूध ओतणं टाळावे. आक्रोश दाखवायचा असेल तर दूध गरीब मोहल्ल्यात वाटप करा. त्यामुळे कष्टाने पिकवलेल्या मालाची नासाडी होणार नाही. त्याउलट गरिबांची सहानभूती मिळेल', असं पवार म्हणाले.'सामान्य माणसाला त्रास होईल, लोकांवर आघात होईल असं काही करु नये. पण हा संघर्ष प्रश्न सुटल्याशिवाय थांबणार नाही, हा निकाल घ्यावा लागेल. सरकारने दिलेली आश्वासन पाळली नाहीत,तशी त्यांची नियत दिसत नाही. शेतकऱ्यांनी याबाबत टोकाची भूमिका घ्यावी असं आवाहन करतो', असं पवारांनी नमूद केलं.मुख्यमंत्र्यांनी पोटनिवडणुकीत पूर्णपणे साम-दाम-दंड-भेदची अंमलबजावणी केली. सत्तेचा गैरवापर केला.



## थोडक्यात महत्वाचे

### लखनऊमधील काकोरी परिसरात स्फोट, तिघांचा मृत्यू

**नवी दिल्ली (सुनील आढाव)**- उत्तरप्रदेशातील लखनऊमध्ये एका घरात स्फोट झाल्याचं वृत्त समोर येत आहे. हा स्फोट इतका भीषण होता की यामध्ये तीन जणांचा मृत्यू झाला आहे तर अनेकजण जखमी झाले आहेत. स्फोटाची



माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस दाखल झाले आहेत. स्फोटानंतर अनेकजण अद्यापही घरामध्ये अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.लखनऊमधील काकोरी परिसरात एका घरात अचानक स्फोट झाला. आतापर्यंत घरातून तीन मृतदेह बाहेर काढले आहेत. घटनास्थळी बचाव आणि मदतकार्य वेगाने सुरु आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, ज्या घरात स्फोट झाला त्या घरात अनधिकृतपणे फटाक्यांचा व्यवसाय केला जात होता.हा स्फोट इतका भीषण होता की घराच्या विटा जवळपास ५० मीटरपर्यंत लांब उडाल्या. घटनास्थळी मोठ्या प्रमाणात पोलीस दल तैनात करण्यात आले आहेत. तसेच घटनास्थळी नागरिकांना जाण्यास बंदी घातली आहे. मात्र, अद्याप या स्फोटासंदर्भात पोलिसांनी कुठलीही अधिक माहिती दिलेली नाहीये.

### हितेंद्र ठाकूरांचा पाठिंबा घेऊ, गद्दारांना धडा शिकवूः राष्ट्रवादी

**मुंबई (हर्षद परब)**- कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसने कंबर कसली आहे. राष्ट्रवादी सोडून भाजपमध्ये गेलेल्या निरंजन डावखरे यांच्याविरोधात राष्ट्रवादीने ठाण्याचे नगरसेवक नजीब मुल्ला यांना उमेदवारी दिली आहे.या निवडणुकीसाठी भाजपविरोधात काँग्रेस,राष्ट्रवादी, शेकाप एकत्र येणार असल्याचा दावा, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला.'राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गद्दाराला धडा शिकवण्याची भूमिका आहे. या निवडणुकीसाठी



राष्ट्रवादी काँग्रेसने बहुजन विकास आघाडीकडेही पाठिंबा मागितला आहे. डावखरे आणि हितेंद्र ठाकूर यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. पण तरीही हितेंद्र ठाकूर यांच्याशी चर्चा सुरु केली आहे. हितेंद्र ठाकूर यांनी भाजप उमेदवाराला म्हणजेच निरंजन डावखरेंना मदत करु नये, राष्ट्रवादीला करावी' असं आवाहन केल्याचं जितेंद्र आव्हाड यांनी सांगितलं. निरंजन डावखरेंची पक्ष सोडण्याची तयारी एक वर्ष आधीपासूनच सुरु होती. म्हणून राष्ट्रवादीच्या मतदारांना निरंजन डावखरेंनी मतदार म्हणून नोंदणी करु दिली नाही. पण कमी दिवस असले, तरी राष्ट्रवादी काँग्रेस मेहनत करणार. गद्दारांना धडा शिकवावा असं कार्यकर्त्यांना वाटते, असं आव्हाड म्हणाले.

### डान्सिंग अंकलला विदिशा महापालिकेचं मोठं गिफ्ट

**भोपाळ (विकास नालुगडे)**- भन्नाट डान्समुळे अल्पावधित लोकप्रिय होत, देशभरात धुमाकूळ घालणाऱ्या डान्सर अंकलला, मध्य प्रदेशातील विदिशा महानगरपालिकेने मोठं गिफ्ट दिलं आहे.डान्सर अंकल अर्थात प्रोफेसर संजीव श्रीवास्तव यांना विदिशा महानगरपालिकेने ब्रॅण्ड अॅम्बेसेडर म्हणून नियुक्त केलं आहे.संजीव श्रीवास्तव यांनी



एका लग्न सोहळ्यात केलेल्या डान्सचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यांच्या गोविंदास्टाईल डान्सवर लोक अक्षरश: फिदा झाले. संजीव श्रीवास्तव अल्पावधीतच प्रकाशझोतात आले आणि मीडियाची हेडलाईन्स बनले. त्याचाच फायदा उचलण्यासाठी विदिशा महापालिकेने अचूक टायमिंग साधलं. संजीव श्रीवास्तव यांना विदिशा महानगरपालिकेने ब्रॅण्ड अॅम्बेसेडर म्हणून नियुक्त केलं. एका लग्नातील जबरदस्त डान्समुळे सोशल मीडिया सेंसेशन बनलेल्या या काकांचा पत्ता लागला. भन्नाट डान्स करणाऱ्या या काकांचं नाव संजीव श्रीवास्तव असून ते मध्य प्रदेशच्या विदिशात राहतात. डब्बू अंकल म्हणून त्यांना ओळखलं जातं.

# पोटनिवडणुकीतील पराभवानंतर भाजपच्या बैठकांवर बैठका

**मुंबई (सम्यक कासारे)**- राज्यात होणारी भाजपची पिछेहाट पाहता, राज्य भाजपने हालचाली वेगवान केल्या आहेत. आगामी विधानपरिषद निवडणूक आणि संघटनात्मक बांधणीचा आढावा घेण्यासाठी राज्य भाजपने मॅरेथॉन बैठका आयोजित केल्या आहेत. पहिली बैठक आज सकाळी ११ वाजता दादरमधील वसंत स्मृती भाजप कार्यालयात होणार आहेत. महाराष्ट्र प्रदेश भाजपच्या पदाधिकाऱ्यांची आणि सर्व जिल्हाध्यक्षांची आज मुंबईत बैठक होणार आहे. त्यानंतर रात्री मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा बंगल्यावर भाजप मंत्र्यांची बैठक होईल.या बैठकांमध्ये राज्यात नुकत्याच पार पडलेल्या पोटनिवडणुका, आगामी विधानपरिषद निवडणुका आणि संघटनात्मक बांधणीचा आढावा घेतला जाणार असल्याची माहिती मिळते आहे.शिवसेनेने स्वबळाच्या घोषणेचा पुनरुच्चार केल्यानंतर, भाजपनेही आता स्वबळच्या चाचपणीसाठी कंबर कसली आहे. एकंदरीत आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने भाजपने हालचाली वेगवान केलेल्या आहेत. नुकत्याच झालेल्या पालघर लोकसभा पोटनिवडणूक आणि गोंदिया-भंडारा लोकसभा पोटनिवडणुकीत भाजपला पिछेहाट सहन करावी लागली. पालघरमध्ये विजय मिळाला असला, तरी आधीपेक्षा भाजपची मतं कमी झाली, तसेच गोंदिया-भंडाराची जागा गमवावी लागली. त्यामुळे या सगळ्या मुद्द्यांच्या पार्श्वभूमीवर आजच्या बैठका महत्त्वाच्या ठरणार आहेत.राज्य भाजपच्या आजच्या बैठकांमध्ये नेमके काय होते, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.



## मुंबईकरांची कामात आघाडी, पगारात पिछाडी



**मुंबई (अमोल गुडेकर)**- रोजीरोटी मिळवण्यासाठी न जाणो देशातील कोणकोणत्या भागातून लोक मुंबई गाठतात. मात्र याच मुंबईत कंबर कसूनही मुंबईकरांना म्हणावं तितका रोजगार मिळत नाही. स्वीस बँक यूबीएसनं केलेल्या सर्व्हेत ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. अलिकडेच जगभरातील ७७ महानगरांमध्ये एक सर्व्हे करण्यात आला. त्यात मुंबईकर खूप कष्टाळू आणि सर्वात जास्त तास काम करतात, असं निरीक्षण नोंदवण्यात आलं आहे. मात्र कमाईच्या बाबतीत मुंबईकरच पिछाडीवर असल्याचंही या सर्व्हेत नमूद करण्यात आलं आहे.मुंबईकर वर्षाला सुमारे ३,३१५.१७ तास काम करतात. वर्षाकाठी काम करण्याचा सरासरी कालावधी १,९८७ तास आहे. म्हणजे युरोपातील रोम (१,५८१ तास) आणि पॅरिस (१,६६२ तास) या शहरांच्या दुप्पट काम मुंबईकर करतात.

## वसईत समुद्र किनाऱ्यावर तिघांचा बुडून मृत्यू

**वसई (राकेश गायकवाड)**- समुद्र किनाऱ्यावर पोहण्यासाठी गेलेल्या ३ तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यु झाला आहे. वसईच्या भूईगाव बीच समुद्र किनाऱ्यावर ही दुर्घटना घडली. हे तिघेही नालासोपाऱ्यात राहणारे आहेत. अभिनव शिंदे, राहुल राठोड, रितेश घेगडमाळ अशी या तीन तरुणांची नावं आहेत. हे तिघेही समुद्रात गेले, त्यावेळी भरती सुरू होती. यावेळी पाण्याचा अंदाज न आल्यानं ते वाहून गेले, आणि त्यांचा मृत्यू झाला...दरम्यान, विरारच्या अर्नाळा बीच वरच्या निसर्ग रिसॉर्ट मध्ये ५ वर्षाच्या चिमुकलीचा बुडून मृत्यू झालाय.. प्राप्ती नरेश पाटील असं या चिमुकलीचं नाव आहे... ती नारंगी या गावाची रहिवासी आहे. शनिवारी ती आपल्या कुटुंबा सोबत रिसॉर्टमध्ये गेली होती. पोहत असतांना तिचा बुडून मृत्य



झाला आहे. प्राप्तीच्या जाण्यानं पाटील कुटुंबीयांवर दुःखा च डोंगर कोसळलाय... याबाबत अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आलीये.. समुद्राच्या खोलीबाबत माहिती नसतानाही पाण्यात शिरणं किती धोकादायक ठरु शकतं, याचंच उदाहरण रत्नागिरीत पाहायला मिळालंय.

## मुलीला सांभाळण्यास नकार हा निषेधार्ह प्रकार

**शिर्डी (केशव सांगळे)**- मुलगी आहे म्हणून तिचा सांभाळ करण्यास नकार देण्याचा प्रकार गंभीर आणि निषेधार्ह असल्याची प्रतिक्रीया पंकजा मुंडेंनी दिली आहे. एकीकडे सरकार मुलींचा जन्मदर वाढवा म्हणून काम करीत असताना मुलगी झाली म्हणून सांभाळण्यास नकार देणाऱ्यावर कारवाई करून ती मुलगी त्यांच्याच ताब्यात देण्याचा प्रयत्न करू असे पंकजा यांनी सांगितले आहे.बीड येथील जिल्हा रुग्णालयात जन्मलेल्या एका मुलीस स्वीकारण्यास तिच्या आई वडिलांनि नकार दिला. मुलगा झाल्याचं चूकून सांगण्यात आल्यानं बाळ बदलल्याच्या संशयावरुन बीडच्या दामप्तत्यानं मुलीचा सांभाळ करण्यास नकार दिला होता. त्यानंतर बाळाची आणि वडलांची डी एन ए चाचणी करून तिला आईवडलांच्या ताब्यात देण्यात आलं मात्र तरिही आई वडिलांनी तिचा सांभाळ करण्यास नकार दिला. या प्रकरामुळे बीडसह राज्यभरात खळबळ उडाली आहे.शासकीय रुग्णालयातला स्टाफ खूश आहे, कारण या बाळाची



आई अखेर त्याला मिळाली आहे. मात्र या आनंदाआधी या बाळानं गेली २१ दिवस आपल्या आईवडिलांचा विरह सहन केलाय. बीडमधल्या एका हॉस्पिटलमध्ये या मुलीचा जन्म झाला असताना, एका नर्सच्या चुकीमुळे मुलगा झाल्याचं पालकांना सांगण्यात आलं. म्हणून पालकांनी आपल्याच हाडामासाच्या या लहानगीला स्वीकारायला नकार दिला होता. अशा परिस्थितीत अत्यंत अशक्त झालेल्या या बाळाला पोलीस औरंगाबाद शासकीय रुग्णालयात घेऊन आले.

## विनोद तावडे आणि राज ठाकरेंची 'कृष्णकुंज'वर भेट

**मुंबई (अमोल गुडेकर)**- शिक्षणमंत्री आणि भाजपचे नेते विनोद तावडे यांनी आज सकाळी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली. राज यांच्या 'कृष्णकुंज' या निवासस्थानी ही भेट झाली. दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे एक तास चर्चा झाल्याचं कळतं. मात्र चर्चेचा तपशील जरी गुलदस्त्यात असला तरी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जात आहे.ठाण्यामध्ये नाट्यसंमेलन होणार आहे. त्याचं निमंत्रण देण्यासाठी स्वत: विनोद तावडे यांनी राज ठाकरेंची भेट घेतल्याची प्राथमिक माहिती आहे. परंतु निमित्त जरी आमंत्रणाचं असलं तर भेटीत विविध मुद्द्यांवर चर्चा झाल्याचं कळतं.गिरीश महाजन यांनी कालच छगन भुजबळ यांची भेट घेतली होती, तर आज तावडे आणि राज यांची भेट झाली.



## सौजन्य व्हॉट्सअप




## शिवसेनेच्या आंदोलनानंतर करी रोड पुलावर दुहेरी वाहतूक सुरू

**मुंबई (विशाल कारंडे)**- दक्षिण-मध्य मुंबईतील करी रोड आणि एल्फिन्स्टन रोड पूलावरील वाहतूक एकेरी करण्यात आलीय. वाहतूक पोलिसांनी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी हा प्रयोग केलाय. शिवसेनेनं या प्रयोगाविरोधात आंदोलन केलं. वाहतूक पोलिस वाहतूक पोलिस कोंडी सोडवण्यास असमर्थ दिसताच. शिवसैनिकांनी करी रोड ब्रीजवर रास्ता रोको केला. ब्रीजवर लावलेले एकेरी वाहतुकीचे फलक तोडून टाकले. वाहतूक पोलिसांचे बॅरिकेडही हटवले. आणि दुहेरी वाहतूक सुरू केली. करी रोड ब्रीजवर पुन्हा दुहेरी वाहतूक सुरू झाल्यामुळे प्रवासीही




आनंदित झाले.सामान्यांना याचा खूप त्रास होतोय, मोठमोठे मॉल, टोलेजंग इमारती आणि पंचतारांकित हॉटेल्सकडून आलेल्या दबावामुळे हा प्रयोग केला जातोय, असा आरोप स्थानिक आमदार अजय चौधरींनी केलाय. त्यासाठी सह्यांची मोहीमही राबवायला सुरुवात केलीय. केलेला हा प्रयोग प्रत्यक्षात मात्र फसलेला पहायला मिळला. या दोन्ही पूलावर होणारी वाहतूक कोंडी सुटण्याऐवजी ती वाढलेलीच पहायला मिळतेय. त्याचा मोठा त्रास सर्व सामान्य नागरिकांना होतोय. नागरिकांना होत असलेल्या या त्रासाच्या निषेधार्थ शिवसेनानं धडक आंदोलन केलं.

## आंदोलक शेतकऱ्यांना तुरुंगात टाका, जामीनही देऊ नका -रविना टंडन

**मुंबई (हर्षद परब)**– महाराष्ट्रात सुरु असलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनावर अभिनेत्री रविना टंडनने टीका केली आहे. अन्नाची नासधूस करणाऱ्या आंदोलक शेतकऱ्यांना जेलमध्ये टाका आणि जामीनही देऊ नका, असे अभिनेत्री रविना टंडनने म्हटले आहे. रविनाने तिच्या ऑफिशियल ट्विटर हँडलवरुन हे ट्वीट केले आहे. 'अतिशय क्लेशदायक घटना आहे. आंदोलनाची ही पद्धत भीषण आहे. सार्वजनिक संपत्ती, वाहतूक आणि साहित्याचं नुकसान करणे दुर्दैवी आहे. आंदोलकांना तातडीने अटक करावी आणि त्यांना जामीनही देऊ नये.', असे अभिनेत्री रविना टंडन हिने ट्वीट केले आहे. रविनाच्या ट्वीटला अनेक जणांनी प्रश्न केले, उत्तर दिले, काहींनी तिच्या विधानाचा प्रतिवादही केला. मात्र तरीही प्रत्येकाला उत्तर देताना रविना टंडनने आपली शेतकरी आंदोलनविरोधी भूमिका सोडली नाही.श्रीनिधी मिश्रा नामक व्यक्तीने रविनाचा प्रतिवाद करताना म्हटले, 'जर शेतकरी सुट्टीवर गेले, तर जग उपाशी राहील आणि मग तुम्हाला खायलाही मिळणार नाही, पर्यायाने तुम्ही असे हे मोफत इंटरनेट वापरण्यासाठी जगूही शकणार नाही.' श्रीनिधी यांच्या ट्वीटला रिप्लाय देताना रविना म्हणाली, 'मग तुम्ही काय



करताय मोफत इंटरनेट वापरुन? तुम्हीही मोफत इंटरनेट वापरणं बंद करा आणि नासाडीला समर्थन करण्याऐवजी मदतीसाठी विचार करा.'

## संपादकीय..

संपादक:- राकेश शंकर गोरे

# अशीही 'सामाजिक' स्त्री भ्रूणहत्या

शासनाने मुलगी असलेल्या नवजात गर्भाला कुठल्याही शासकीय व्यवस्थेत पूर्ण मोफत उपचाराची हमी व महाराष्ट्रात गर्भवती माता ॲनिमियामुक्त करणे एवढे किमान दोन संकल्प सोडून त्याची पूर्तता करण्यास सुरुवात केली तरी खूप मोठा बदल घडून येईल. आज जन्मानंतर सुरू असलेल्या या स्त्री भ्रूणहत्या रोखण्याची जबाबदारी कोणाला तरी घ्यावी लागेल. मुलींचे प्रमाण वाढवून भागणार नाही, त्या प्रमाणात त्यांचे नंतर जगणे व त्यांच्या जगण्याचा स्तरही वाढवावा लागेल.

गेल्या महिन्यात गलथान सरकारी कारभाराचे व नातेवाइकांच्या व पर्यायाने समाजाच्या जन्माला आलेल्या मुलीला नाकारण्याच्या मानसिकतेचे क्रूर दर्शन बीड जिल्ह्यात घडले. बीड येथील एका खासगी बाल रुग्णालयात १ किलो वजनाचे व ९ महिने पूर्ण होण्यापूर्वी जन्माला आलेले बाळ अत्यवस्थ परिस्थितीत बीड जिल्हा रुग्णालयातून आले. अथक परिश्रमानंतर बाळ बरे होऊ लागले, पण सुटीची वेळ जवळ आल्यावर आठव्या दिवशी मला झालेले बाळ हे नाही, तसेच मला मुलगा झाला होता, ही मुलगी आहे म्हणून थेट हे बाळच पालकांनी नाकारले होते. जिल्हा रुग्णालयातही बाळाची नोंद मुलगा म्हणूनच आढळून आली. त्यानंतर मात्र संबंधित डॉक्टरांवर पोलिस तक्रार, माध्यमांचे आरोप, नातेवाइकांचे आरोप असे शुक्लकाष्ठच सुरू झाले. अखेर डी.एन.ए. चाचणीनंतर हे बाळ त्याच पालकांचे व मुलगी असल्याचे सिद्ध झाले. अखेर पालकांनी हे मूल स्वीकारले. या सर्व प्रकारांतून दोन प्रातिनिधिक गोष्टी प्रकर्षाने समोर येतात. बाळाचा जन्म झाल्यावर त्याच्या लिंगाची नोंद करण्याची एक शास्त्रोक्त पद्धत असते. बाळ झाल्या झाल्या आई व एका जवळच्या नातेवाइकांना बाळाचे लिंग दाखवून हे काय आहे? हे त्यांच्याकडूनच वदवून लगेच त्याची नोंद पेपरवर घेऊन बाळाच्या पायाचे ठसे नोंदवायचे असतात. लिंग वादातीत असल्यास डॉक्टर तपासणी करून त्याविषयी निर्णय घेतात. पण ही गोष्ट न करता मुलीची नोंद मुलगा म्हणून झाल्याने एवढा मोठा अनर्थ झाला. यापूर्वीही मुलगी झाल्याने ती नाकारून मुलगा होता, असा आरोप पालकांकडून झाल्याच्या अनेक घटना झाल्या आहेत. कदाचित मुलाची नोंद चुकून मुलगी झाली असती तर पालकांनी २० दिवस या बाळाला दुधाशिवाय सोडून व हे बाळ आपलेच आहे हे कळूनही ताबा नाकारला नसता. स्त्री भ्रूणहत्येविषयी सरकार अनेक पातळ्यांवर प्रयत्न करते आहे व ते गरजेचेच आहे. पण हे प्रयत्न फक्त सोनोग्राफी सेंटर्स व डॉक्टरांची तपासणी इतपतच मर्यादित आहेत. हे सगळे नियम, प्रयत्न बाळाला जन्माला घालण्यापूर्वीच स्त्री भ्रूणहत्या रोखणारे आहेत. मुलगी जन्माला आल्यानंतरही तिची परवड थांबत नाही. मुलगी जन्माला येऊच नये हा पालकांचा पहिला प्रयत्न असतो. त्यानंतर ती जन्माला आली तरी जगू नये म्हणूनही अनेक पातळ्यांवर हत्येचे प्रयत्न सुरूच असतात.



नवजात शिशूतज्ज्ञ म्हणून आम्ही बाळाचे उपचार करत असतो तेव्हा बाळ मुलगी आहे की मुलगा याच्याकडे आम्हा डॉक्टरांचे कधीच लक्ष नसते. पण बरे होऊ लागलेले किंवा उपचारांना प्रतिसाद देऊ लागलेले बाळ पालक उपचार नाकारून घरी घेऊन जाऊ लागतात तेव्हा लक्षात येते की हे बाळ मुलगी आहे. उपचारांमध्ये पैशाची सूट देऊनही किंवा सरकारी योजनेत मोफत उपचार करण्याची तयारी असूनही बऱ्याचदा मुलगी आहे म्हणून नवजात अर्भकाला घरी नेले जाते. स्त्री भ्रूणहत्या रोखली व मुलगी जन्माला आली म्हणजे शासनाची व आपली जबाबदारी संपली का? अशा प्रकारे उपचार नाकारणाऱ्या पालकांवर व बाळ मुलगी आहे. म्हणून तिला उपचारांपासून वंचित ठेवणाऱ्या पालकांवर कारवाई व्हायला नको का? बीड येथील प्रकारात तर या मानसिकतेचा कळस दिसून येतो. नवजात विभागातच नव्हे, तर पुढेही आरोग्याच्या बाबतीत ही परवड सुरूच राहते. त्यातूनच आज महाराष्ट्रात ७८,००० गरोदर महिला ॲनिमियाग्रस्त आहेत व महाराष्ट्र देशात या आजाराची राजधानी ठरतो आहे. सध्या गर्भलिंग तपासणीचे प्रमाण बरेच कमी झाले आहे. पण म्हणून गर्भलिंग तपासणी करू इच्छिणाऱ्या व मुलगी नको असलेल्या पालकांचे प्रमाण मात्र कमी झालेले नाही हे यावरून स्पष्ट होते. या पालकांनाही कायद्याचा धाक असायला हवा. कुठे गर्भलिंग चाचणी होईल याचा शोध घेत हजारो पालक फिरत असतात.

डॉक्टरांनी असे पालक दाखवून दिल्यास त्यांच्यावर खुनाच्या प्रयत्नाचे गुन्हे दाखल होऊन तपास व्हायला हवा. फक्त कायद्याचा धाक दाखवूनही हा सामाजिक प्रश्न सुटणार नाही. ही मुलगी आपल्या घरात आपल्याला हवी, हे पालकांकडूनच येण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. या घटनेतून आधीच जिकिरीच्या झालेल्या वैद्यकीय व्यवसायातील अजून एक न्यायवैद्यक गुंतागुंतही समोर आली आहे. इथून पुढे सरकारी किंवा इतरत्र झालेले बाळ नवजात शिशू कक्षात दाखल होते तेव्हा जन्म झाला त्या रुग्णालयातील लिंगाची नोंद डॉक्टरांनी मागवून घ्यावी. ती नोंद बरोबर आहे की नाही, याची चाचपणी करावी. ती सारखी असल्याचे व बाळाच्या मूळ जन्माच्या वेळची नोंद व दाखल करत असलेल्या रुग्णालयातील लिंगाची नोंद सारखी असल्याचा व ती आम्हाला मान्य असल्याची नोंद कन्सेंट फॉर्म म्हणजे रुग्ण दाखल होत असतानाच्या प्रतिज्ञापत्रात करावी.डॉक्टरांवरील अविश्वासाची पातळी आता – डॉक्टरांनी आमचे बाळ बदलले, पळवले, या स्तरावर गेली आहे. त्यामुळे याविषयीची न्यायवैद्यक बाजू मजबूत करण्यावाचून डॉक्टरांना पर्याय नाही.

या प्रकारातून शासकीय आरोग्य व्यवस्थेचे धिंडवडेही निघाले आहेत. काही प्रमाणात सरकारी डॉक्टरांची चूक असली तरी याचे सगळे खापर शासकीय व्यवस्थेत काम करणाऱ्या डॉक्टरांवरही फोडता येणार नाही. चार – दोन कर्मचाऱ्यांच्या, डॉक्टरांच्या निलंबनाने असे प्रश्न सुटणार नाहीत. एवढ्या प्रकरणात आरोग्य मंत्र्यांकडून किंवा आरोग्य विभागाकडून दिलगिरीचे चार शब्दही येऊ नयेत हे खेदजनक आहे. शासकीय व्यवस्थेत काम करणाऱ्या डॉक्टरांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

# समस्या वाढवणारा संप

'अभूतपूर्व' असे वर्णन झालेल्या शेतकरी संपाची वर्षपूर्ती नुकतीच झाली. या वर्षपूर्तीच्या निमित्ताने काही घटकांनी वार्षिक कार्यक्रम असल्याप्रमाणे पुन्हा एकदा संपाचीच हाक दिली आहे. 'काही घटकांनी' असे म्हणण्याचे कारण म्हणजे शेतकऱ्यांसाठी लढणाऱ्या पारंपरिक शेतकरी संघटना तटस्थ आहेत. आजवर शेतकऱ्यांची कड न घेणाऱ्या डाव्या संघटनांनी मात्र शेतकरी संप लावून धरण्याचे ठरवले आहे. खरे तर मार्क्स-माओपासून चीन-रशियापर्यंतच्या परकीय आदर्शांवर आणि विचारसरणीवर पोसलेल्या डाव्यांनी नेहमीच कामगार, ग्राहकांच्या हितरक्षणाची बात केली. ती करताना शेतकऱ्यांच्या सर्वसामान्य आशा-आकांक्षांना पायदळी तुडवण्यात आजवर धन्यता मानली. काळाचा महिमा असा की शहरी कामगार-ग्राहक आस्तेआस्ते 'लाल बावट्या'च्या सावलीतून बाहेर पडू लागल्याने डाव्या संघटनांच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. जगभरात अपयशी ठरलेल्या साम्यवादी, डाव्या विचारसरणीला भारतीय कामगार, मजुर, मध्यमवर्गानेही झिडकारले यात नवल ते काय? साम्यवादी संघटनांचे राजकीय अस्त्वि आक्रसते आहे. कामगारांमध्ये प्रस्थापित राजकीय पक्षांनी मुसंडी मारली आहे. त्यामुळेच शेती आणि शेतीपूरक उद्योग-व्यवसायांवर अवलंबून लोकसंख्येकडे डाव्यांनी नियोजनपूर्वक मोर्चा वळवला आहे. वास्तविक चाळीसच्या दशकातच याची सुरुवात झाली. काँग्रेसला आव्हान देण्याकरिता, काँग्रेसमधूनच फुटलेल्यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. मात्र, शेकाप हा खऱ्या अर्थाने कधीच 'डावा' झाला नाही. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांमध्ये 'कॉम्रेड्स' घुसवण्याचे प्रामुख्याने महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेशात नव्याने सुरू झालेले प्रयत्न लक्षणीय आहेत. शेतकऱ्यांच्या समस्यांबद्दल कोणाचे दुमत नाही. त्यामुळेच कोणाच्या आरवण्याने का असेना सूर्य उगवणार असेल तर डाव्यांच्या शेतकरी प्रेमालाही आक्षेपाचे कारण नाही. शेतकरी नेतृत्व करणाऱ्या पारंपरिक संघटना, राजकीय पक्षांना मात्र तसे वाटत नाही. आंदोलनांमध्ये फडकणारा 'लाल बावटा' त्यांना आक्षेपार्ह वाटतो आहे.

शरद जोशींची मूळ शेतकरी संघटना आणि जोशींना गुरुस्थानी मानून काम करणाऱ्या राजू शेट्टी, रघुनाथदादा पाटील, सदाशिव खोत यांच्या शेतकरी संघटनांनी शेतकरी संपापासून स्वतःला अलग ठेवले आहे. राजकीय पक्ष अंतर राखून आहेत. संपाला विरोध नाही, परंतु गेल्यावेळेसारखे अप्रत्यक्ष सहकार्यही अद्याप कोणी करताना दिसत नाही.



## शब्दकोडे क्रमांक-१०



**आडवे शब्द:** १. भारताचे पंतप्रधानपर भुषविणारे पिता-पुत्री १०. पाण्यावरची लहर ११. सामान १२. प्रजा १४. व्यापारी (वृत्ती) १६. स्वभावातील मऊपणा १८. बरोबर आलेला फौजफाटा २१. जवळ (हिंदी) २३. समानता २४. प्रयत्न २६. वाळवंट २७. विलासी स्त्री २८. गाय २९. नवरदेव ३०. थोर, मोठा ३१. बोकड ३२. जगण्याचा वा इतिहासाचा टप्पा ३३. घट्टच्या विरुद्ध ३४. पोथी, पुस्तक गुंडाळण्याचे वस्त्र ३५. पानांची हालचाल, 'हिरव्या पानात, हिरव्या रानात --- -- चालती' (जैत रे जैत) ३८. वायू, हवा ३९. वेदना, खटका ४०. मनाला लागलेली बोच ४२. कपडे पांढरेशुभ्र करणारा रंग! ४३. निकट, काही अंतरावरच ४५. विहिरीतून पाणी काढण्याचे जोडसाधन ४८. भडीमार, मारा ४९. मुस्लिमांचा उपवासाचा महिना ५०. स्त्री भूत ५२. एकरूपता ५५. आरडाओरड, बोंबाबोंब ५८. अखंड ६०. बैलाच्या शिंगांना बांधण्याचा दोर ६२. तांदळाची मोठ्या दाण्याची जात ६४. हिंमत, छाती ६६. आग्रा येथील ऐतिहासिक वास्तू ६८. अंदाज, तर्क ७०. नासाडी, धूळधाण ७१. गुरांचा समुदाय ७२. भात शिजतानाचा आवाज ७४. अंकुर ७६. संपणे ७७. तारांबळ ७८. दार बंद करण्याची सोय

**उभे शब्द:** १. नावेचे पाण्यात पदार्पण २. हिस्सा ३. लक्ष्मी ४. संगोपन ५. सतत, रोज ६. खिशातील वस्त्र ७. राजाची आई ८. धैर्य ९. शेवट १३. एकूण एक, सर्व १५. अबोल्याची खूण १७. जीभ १९. गाईचे पिल्लू २०. बस्तान २२. दाह, आग २५. साधा, छक्केपंजे नसलेला २७. बारीक सारीक ३०. रग्गड ३१. सोपे नसलेले ३२. घटिकेचा हिस्सा ३३. सरसरीत ३४. मूल, बालक ३६. खार ३७. सततची हालचाल ३८. संधी, मोका ३९. पळसाचा डिंक ४१. केसांची बट ४३. एक गळीत धान्य ४४. लोकमाता ४५. अतिशयोक्ती करणे याअर्थी वाक्प्रचार ४६. गाणे म्हणणारी ४७. घर ५१. डबके, डमरू ५३. मनात साचून राहिलेली घाण ५४. ए.के. हंगल यांचे 'शोले'तील प्रसिद्ध वाक्य 'इतना --- क्यों है भाई' ५५. त्वरेने, हस्तेपरहस्ते ५६. समीक्षा ५७. तुळतुळीत गोटा ५९. वेल ६१. कृश व उंच शारीरिक ठेवण ६३. अर्धांगवायू ६५. उपकार ६७. हावरटपणा ६९. दूध वा दुधाचे पदार्थ ७१. रोटी आणि मकान बरोबर हा देखील हवाच ७३. चेष्टा ७५. अमेरिकेला नुकतेच त्रस्त करून गेलेले वादळ

## थोडक्यात महत्वाचे

### 'कोल्डमिक्स'द्वारे मुंबईला खड्ड्यातून बाहेर काढणार!

**मुंबई (सम्यक कासारे)-** मुसळधार पावसात मुंबईचे रस्ते खड्ड्यात जाणार असल्याची पुरेपूर खात्री असलेल्या महापालिका प्रशासनाने खड्डे दुरुस्तीसाठी तयारी सुरू केली आहे. यासाठी गेल्या वर्षी यशस्वी ठरलेले कोल्डमिक्स हे अत्याधुनिक पद्धतीने तयार केलेले मिश्रण खड्डे भरण्यासाठी वापरण्यात येणार आहे. गेल्या वर्षी १७० रुपये किलो या दराने हे मिश्रण खरेदी करावे लागले होते. या वर्षी मात्र महापालिकेच्या वरळी येथील कारखान्यातच हे मिश्रण तयार झाल्याने महापालिकेची प्रति दरवर्षी पावसाळ्यात मुंबईतील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडतात. मुंबईला खड्डेमुक्त करण्यासाठी महापालिकेने तीन वर्षांचा आराखडा तयार करून रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण सुरू केले.

## टाईमपास

निलेश : डॉक्टर, मला काय होतंय तेच समजत नाही.

डॉक्टर : तुम्हाला फक्त एकच आजार आहे. तुमची नजर कमजोर आहे.

निलेश : कशावरून?

डॉक्टर : माझ्या दवाखान्यावर बाहेर पाटी आहे. 'जनावरांचा दवाखाना' अशी.

◆◆◆

एका महिलेला रात्री अपरात्री भटकताना पाहून पोलिसांनी विचारले, बाई तुम्हाला एकट्याने असे हिंडताना भीती नाही का वाटते.

का बरे? आमची सुरक्षा यंत्रणा सुधारली आहे, असेच नां.

महिला - नाही.

पोलिस - मग.

महिला - सध्या सगळे चोर, गुंड दरोडेखोर निवडणुकीत बिझी आहेत म्हणून !

◆◆◆

तुमच्या दुखण्यावर एकच इलाज आहे. डॉक्टर म्हणाले, 'दारु सोडा'

त्यावर रोग्याने उलट प्रश्न विचारला 'डॉक्टरसाहेब, सोडा नाही घातला तर नाही का चालणार?'

## सुडोकू क्रमांक-१०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 6 | 4 | | 8 | 2 | | 7 |
| | 3 | 8 | 1 | 2 | 6 | | | |
| 1 | | | | | | | 6 | |
| | | 5 | | | | | | 4 |
| 9 | | | 7 | | 1 | | | 3 |
| 2 | | | | | | 5 | | |
| | 8 | | | | | | | 2 |
| | | | 6 | 7 | 5 | 4 | 8 | |
| 4 | | 7 | 9 | | 2 | 6 | 3 | |





JOB NO
डीजीआयपीआर/२०१८-२०१९/११५१

हे मराठी साप्ताहिक **मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक राकेश गोरे** यांनी सोमानी प्रिंटींग, प्रेस गाला नं. ३-४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड नं. २,जवाहर नगर फाटक ब्रिज जवळ, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३. येथे छापून विष्णू सदन सोसायटी रामचंद्र सुखई सोसायटी नं. १, रूम नं. ४, जयहिंद नगर, खार (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. येथे प्रकाशित केले. R.N.I. NO. MAHMAR/2010/33301. Mob. 9892631863, 9892632268, 022-69998811, website:maharashatracrimetimes.com, **Email-Info@maharashtracrimetimes.com** maharashtracrimetimes33301@gmail.com, **कायदेशीर सल्लागार-** एडवोकेट, हाईकोर्ट मुंबई, डी. के. पांडे (बी.ए.एल.एल.बी.) हा अंक प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# दीपक मानकर ‘आऊट ऑफ कव्हरेज’!

**पुणे (अभिजीत येरल्लु)-** कर्मचाऱ्याला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी राष्ट्रवादीचा पुण्यातील नगरसेवक दीपक मानकरवर गुन्हा दाखल झाला आहे. मात्र गुन्हा दाखल झाल्यानंतर मानकर पसार झाला आहे.पुणे पोलिसांकडून



त्याचा शोध घेण्यात येतोय. काल पुण्यातील दोन्हीही घरी तो पोलिसांना सापडला नाही. मानकरचा फोनही आऊट ऑफ कव्हरेज येत आहे. मानकर यांच्याकडे गेली अनेक वर्षे काम करणाऱ्या जितेंद्र जगताप नावाच्या व्यक्तीने काल २ जूनला घोरपडी भागात रेल्वेखाली उडी घेऊन आत्महत्या केली होती. आत्महत्येपूर्वी जितेंद्र जगताप यांनी लिहलेल्या सुसाईड नोटमध्ये दिपक मानकर, बिल्डर सुधीर कर्नाटकी, विनोद भोळे यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करत असल्याचं म्हटलं आहे.रास्ता पेठेतील एका जागेच्या वादातून हा प्रकार घडला. जितेंद्र जगताप हा गेली अनेक वर्ष दीपक मानकरांचे जमिनीचे व्यवहार पाहात होता. मात्र गेल्या काही महिन्यांपासून समर्थ पोलिस स्टेशनसमोर असलेल्या जागेवरुन दोघांमध्ये वाद सुरु होता. त्यासाठी मानकर, कर्नाटकी, भोळे यांच्या अनेकवेळा बैठकाही झाल्या होत्या. जागेचा ताबा सोडण्यासाठी मानकर जितेंद्र जगतापवर दबाव टाकत होते. दरम्यान जितेंद्र जगताप हा खंडणी उकळण्यासाठी आत्महत्येची धमकी देत होता आणि त्याबद्दलचा अर्ज आपण १ जूनलाच पोलिस आयुक्तालयात दिल्याचं म्हटलं आहे.दीपक मानकर यांची कारकीर्द सुरुवातीपासूनच वादग्रस्त राहिली आहे. काँग्रेसमध्ये असताना नातू वाड्यातील जमीन बळकावण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांना अटक झाली होती.

# नवविवाहितेनंच केला पतीचा खून, काय आहे रहस्य?

**सातारा (प्रकाश पवार)-** महाबळेश्वरला आपल्या पत्नीसह फिरण्यासाठी आलेल्या तरुणाचा धारदार शस्त्राने खून झाला. या खुनाचा उलगडा सातारा पोलिसांनी अवघ्या चोवीस तासात लावला असून या तरुणाचा खून पत्नीनेच केल्याचं उघड झालं. काय आहे या खुनाचं रहस्य आणि आणि नवविवाहितेने आपल्या पतीचा का खून केला?ही आहे दीक्षा कांबळे. अतिशय सुंदर, नटखट अशी आनंदी वाटणारी नववधू. आनंद कांबळे नावाच्या आयुष्यात नवे रंग भरण्यासाठी तिने सात जन्माच्या गाठी बांधल्या. पण काही क्षणातच दीक्षाचं खरं रूप समोर आलं आणि आनंदच्या आयुष्यात जीवनसाथी बनून आलेली ही दीक्षा काही क्षणातच व्हिलन ठरली.झालं असं की २० मे रोजी यांचं लग्न झालं आणि हनिमूनसाठी ही नवविवाहीत



जोडपं महाबळेश्वरला फिरायला आले आणि तिथं विश्वास बसणार नाही अशी धक्कादायक घटना घडली. दीक्षा आणि आनंदवर साताराजवळील पसरणी घाटात अज्ञातांनी धारदार शस्त्राने हल्ला केला. त्यात आनंद याचा मृत्यू झाला तर दीक्षा जखमी झाली. प्रथमदर्शी या जोडप्यावर लुटमारीमुळे हल्ला झाल्याचं दिसून आलं. मात्र पोलिसांना तिथे काहीतरी काळबेरं असल्याचा संशय आला आणि मग तपास सुरू झाला.दीक्षाचे पुणे येथील नितीन मळेकर या युवकासोबत प्रेमसंबध होते. लग्नाला घरातील लोकांकडून विरोध असल्यामुळे तिने घरातील लोकांच्या मर्जीने नातेसंबंधातील आनंदशी लग्न केलं.

# NEET Result 2018 : ‘NEET’चा निकाल जाहीर, नांदेडचा कृष्णा देशात सातवा

**मुंबई (विशाल कारंडे)-** नॅशनल एलिजिबिलिटी कम एन्ट्रन्स टेस्ट (NEET) परीक्षेचा निकाल सीबीएसईकडून जाहीर करण्यात आला आहे. कल्पना कुमारी ही ऑल इंडिया रँकमध्ये पहिली आली असून, तिला ७२० पैकी ६९१ गुण मिळाले आहेत. महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील कृष्णा अग्रवाल हा तरुण देशात ७ वा आला असून, कृष्णाला ७२० पैकी ६८५ गुण मिळाले आहेत. तसेच, कृष्णा बायोलॉजी विषयात देशात पहिला आला आहे.कृष्णाचे वडील आशिष अग्रवाल हे बालरोगतज्ज्ञ आहेत,



तर आई डेंटिस्ट आहेत.यंदाचा नीट परीक्षेचा कट ऑफ घसरला असून, जनरल कॅटेगरीसाठी यावर्षी ५० टक्के म्हणजे ७२० पैकी ११९ मार्क्स आहेत. मागच्या वर्षी हा कट ऑफ १३१ होता. तर ओबीसी, एससी, एसटीसाठी हा कट ऑफ ४० टक्के म्हणजे ७२० पैकी ९६ मार्क्स असणार आहे, जो मागच्या वर्षी १०७ होता. यंदा ७ लाखापेक्षा जास्त विद्यार्थी कौन्सिलिंग राऊंडसाठी पात्र ठरले आहेत. MBBS, BDS या वैद्यकीय शिक्षणासाठी सीबीएसईकडून ही प्रवेश परिक्षा घेतली जाते.

# आंदोलनानंतर शेतकरी नेत्याचा मृत्यू

**नागपूर (प्रतिनिधी)- अवघ्या राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या शेतकरी आंदोलनातून एक दुःखद बातमी आली आहे. नागपूरमध्ये झालेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनात एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला आहे. जय जवान जय किसान संघटनेच्या वतीने दूध फेको आंदोलन करण्यात आले होते, या आंदोलनात सहभागी झालेले जय जवान जय किसान संघटनेचे उपाध्यक्ष शरद खेडीकर यांचा आंदोलनानंतर लगेच मृत्यू झालाय.**

आंदोलनानंतर त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने सहकाऱ्यांनी त्यांना रुग्णालयात नेले मात्र उपचारा आधीच त्यांचा मृत्यु झाला होता. हृदयविकाराच्या झटक्यामुळे मृत्यु झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.नागपूरमध्ये जय जवान जय किसान संघटनेने रस्त्यावर दूध ओतून शेतकरी आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. किसान महासंघातर्फे सुरू असलेल्या देशव्यापी शेतकरी संपाला पाठिंबा दर्शवण्यासाठी तसंच शासनाचा निषेध व्यक्त करण्यासाठी दूध रस्त्यावर फेकून नागपुरात हे आंदोलन करण्यात आलं. तसेच, काही गोर-गरिबांनाही दूध वाटप करण्यात आलं. दरम्यान, शेतकरी आंदोलनाचा आज चौथा दिवस आहे. शेतकरी आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी आज नागपुरातही आंदोलन निदर्शने करण्यात आले... ’जय जवान जय किसान’ संगठने च्या कार्यकर्त्यांनी आज सरकार विरोधात जोरदार घोषणा बाजी करत काही दूध रस्त्यावर ओतून दिल तर काही दूध मात्र मोफत मध्ये लोकांना वाटण्यात आलं. यावेळी कृषी मंत्री राधा मोहन सिंग यांच्या विराधात सुद्धा जोरदार घोषणाबाजी केली.

# शिवसेना सोबत नसेल तर २०१९ नंतर भाजप विरोधी बाकावर असेल -अजित पवार यांचे भाकीत

**पुणे (अभिजीत येरल्लु)- ‘शिवसेना बरोबर राहिली नाही तर २०१९ नंतर भाजपने विरोधात बसायचे ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे,’ असे ठाम प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांनी केले आहे. मात्र, सध्याच्या सरकारमधून शिवसेना बाहेर पडणार नाही. आगीतून उठून फुफाट्यात कोणी जाणार नाही, अशी टिप्पणीही त्यांनी केली.**

राज्यातील लोकसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पवार म्हणाले, अमित शहा, नितीन गडकरींपासून देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, रावसाहेब दानवे यांच्यापर्यंत प्रत्येक जण आता नरमाईची भूमिका घेत शिवसेनेबरोबर युती करण्याची भाषा बोलत आहेत. देशातले वातावरण बदलत असल्याचे पाहून भाजपने सुरुवातीच्या काळातला ताठरपणा सोडला आहे. वेळ आल्यास भाजप आता शिवसेनेला उपमुख्यमंत्रिपद देईल, पुढचे मुख्यमंत्रिपददेखील अडीच-अडीच वर्षे वाटून घेईल.

पालघर निवडणुकीच्या निमित्ताने भाजप, शिवसेनेने एकमेकांचे अगदी वाभाडे काढले. काहीही झाले तरी २०१९ ची निवडणूक स्वतंत्र लढणार असल्याचे उद्धव ठाकरे अतिशय कडक भाषेत वारंवार सांगत आहेत.



भाजपचे निर्णयकर्ते नेते मात्र शिवसेनेसोबत जाण्याची भाषा करत आहेत. शिवसेना स्वतःच्या मतावर ठाम राहिली तर पुढच्या निवडणुकीनंतर भाजप सत्तेत नसेल, असे पवारांनी स्पष्ट केले.

भाजपविरोधातल्या समविचारी पक्षांच्या मतांमधली फूट टाळण्याचा संदेश भंडारा-गोंदिया आणि पालघरच्या निकालातून जनतेने आम्हाला दिला आहे. दोन्ही काँग्रेसच्या नेत्यांना तुटेपर्यंत न ताणण्याचे धोरण घ्यावे लागेल, असे पवार म्हणाले. प्रत्येकाने एक-दोन पावले मागे-पुढे सरकण्याची तयारी ठेवली तर सन्मानपूर्वक जागावाटप होईल.

# मुंबईकरांची झोप उडाली: ७९ टक्के लोक कामावर पेंगतात

**मुंबई (विशाल कारंडे)- मुंबईकरांना पुरेशी झोप मिळत नसून त्याचे परिवर्तन निद्रानाश, असंतुलित झोप यांसारख्या समस्यांमध्ये होत असल्याची धक्कादायक बाब वेकफिट या भारताच्या आघाडीच्या मॅट्रेस आणि झोपेशी संबंधित उत्पादनांच्या कंपनीने केलेल्या सर्वेक्षणातून स्पष्ट झाली आहे. पुरेशी झोप मिळत नसल्याचा परिणाम मुंबईकरांच्या कामावरदेखील होत असून त्यांनी कामावर झोप येत असल्याचे मान्य केले आहे. ७९टक्के मुंबईकरांना आठवड्यातून १-३ वेळा कामावर झोप येते, आठवड्यातून ४-५ वेळा झोप येणाऱ्यांचे प्रमाण ६ टक्के आहे तर रोज कामावर झोप येणाऱ्यांचे प्रमाण १५ टक्के इतके आहे.**

वेकफिटने मुंबईत तीन महिन्यांच्या कालावधीत सुमारे ७५०० नागरिकांना यासंबंधी प्रश्न विचारुन सर्व्हे केला. हे सर्वेक्षण विविध प्रकारच्या प्रतिसादकांवर करण्यात आले आहे. यातील ७१ टक्के लोक विवाहित आहेत, २६ टक्के लोक अविवाहित आणि ३ टक्के लोकांची झोप उडाली आहे. म्हणजेच ते प्रेमात पडले आहेत. सातत्यपूर्ण अपुऱ्या झोपेचा व्यक्तीच्या मन आणि शरीरावर परिणाम हातो. सतत थकल्यासारखे वाटते आणि त्याचा त्रासही होतो. वेकफिटच्या सर्वेक्षणातून हीच बाब प्रकर्षाने जाणवते. अपुऱ्या झोपेमुळे ५३ टक्के लोकांना पाठदुखीच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे



तर १८ टक्के लोकांना निद्रानाशाची समस्या भेडसावत आहे. सर्वेक्षणातून असे दिसून आले की १७ टक्के लोक मध्यरात्रीनंतर झोपतात आणि ४० टक्के लोक रात्री ११ नंतर झोपतात. खरे तर, मनुष्याच्या शरीराच्या रचनेनुसार रात्री १० ते १०.३० ही झोपण्याची नियमित वेळ असावी असा सल्ला दिला जातो, पण या वेळेत झोपी जाणाऱ्यांचे प्रमाण केवळ २८ टक्के इतकेच आहे. रात्री उशिरा झोपल्यामुळे व्यक्ती उशिरा उठतो, असे मत २० टक्के लोकांनी व्यक्त केले असून ते सकाळी ८ नंतर जागे होतात.

# जगभरातील दुग्धव्यवसाय संकटात

**कोल्हापूर (संदेश पाटील)-** जगभरात दुधाचा सुकाळ झाला असून अतिरिक्त दुधाची भुकटी करणे भाग पडत आहे. गरजेपेक्षा दुधाची भुकटी खूपच अधिक झाल्याने दरात प्रचंड घसरण झाली आहे. भुकटीचा महापूर झाल्याने भारतातील आणि महाराष्ट्रातील सशक्त दूध संघही आर्थिक कुपोषणाच्या गर्तेत सापडले



आहेत. जगात पाच लाख टन, देशात तीन लाख टन आणि महाराष्ट्रात ४० हजार टन भुकटीचा साठा पडून आहे. आणखी दोन वर्षे भुकटीच्या साठय़ाचा ससेमिरा मागे राहणार असल्याचा अंदाज वर्तवला गेला असल्याने दूध संघाच्या तोंडाचे पाणी पळाले आहे. एका महाराष्ट्राचेच ५०० कोटी रुपये नुकसान असून दिवसेंदिवस हा आकडा कोटीच्या कोटी उड्डाणे घेत आहे. भारत जागतिक दुग्धउत्पादनातील प्रमुख देश आहे. मागील दोन दशकांपासून जागतिक पातळीवर भारत दूध उत्पादनात प्रथमस्थानी कायम आहे. देशातील दुग्ध उत्पादन ६०च्या दशकातील १७. २२ दशलक्ष टनांवरून २०१६-१७ मध्ये १६५.४ दशलक्ष टन अशा विक्रमी उच्चांकापर्यंत पोहोचले आहे. तर मागील तीन वर्षांत देशातील दुग्धउत्पादनात प्रति वर्षी ६.३ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे. ही वाढ जागतिक दुग्धउत्पादनातील प्रतिवर्षी होत असलेल्या वाढीच्या तिपटीने अधिक आहे. मागणीपेक्षा हे प्रमाण किती तरी अधिक आहे. यामुळे दूध संघांना अतिरिक्त दुधाची भुकटी करण्यावाचून पर्याय राहिलेला नाही. हे चित्र जगभर आहे.

# चार वर्षात लोकसभेच्या २७ पैकी फक्त ५ पोटनिवडणूका भाजपनं जिंकल्या

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)-** गेल्या चार वर्षात भाजपने देशातली अनेक राज्य जिंकून आपलं वर्चस्व निर्माण केलं. पण पोटनिवडणूकांमध्ये मात्र भाजपला सतत पराभव पत्करावा लागला. विरोधी पक्ष हे फक्त पोटनिवडणूकीत जिंकणारे पक्ष आहेत अशी टीका भाजपनं केली मात्र विरोधकांची एकजूट होत असल्यानं २०१९ च्या दृष्टीने भाजपसाठी चिंतेचा विषय आहे.

लोकसभेच्या चार आणि विधानसभेच्या ११ जागांसाठी निकाल लागले. त्यात



महाराष्ट्रातली लोकसभेची पालघर आणि उत्तराखंडमधली थराली ही विधानसभेची जाग सोडली तर सर्वच ठिकाणी पराभव स्विकारावा लागला. उत्तर प्रदेशमधल्या कैराना या लोकसभेच्या जागेवर सर्व विरोधीपक्ष एकत्र आल्यानं भाजपचा पराभव झाला. तर गेल्या चार वर्षात काँग्रेसनेही फक्त ५ जागाच जिंकल्या आहेत. त्यातली अमृतसर वगळता इतर चार जागा काँग्रेसनं भाजपकडून खेचून आणल्या आहेत. त्याखलोखाल तृणमूल काँग्रेसने ४ जागा जिंकल्या.

# कश्मीरमध्ये हाय अॅलर्ट, रमजानमध्ये दहशतवाद्यांचा रक्तपाताचा कट



**श्रीनगर (वृत्तसंस्था)-** रमजानच्या महिन्यात केंद्र सरकारने जम्मू कश्मीरमध्ये दहशतवाद्यांविरोधात कोणतीही कारवाई न करण्याचे आदेश लष्कराला दिलेले असताना दहशतवाद्यांनी मात्र रमजानमध्ये रक्तपात घडविण्याचा कट रचला आहे. जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचे १२ दहशतवादी कश्मीरमध्ये घुसले असून त्यांचा कश्मीरमध्ये फिदाहीन हल्ला करण्याचा प्लॅन असल्याचा इशारा गुप्तचर संघटनांनी दिला आहे. त्यामुळे कश्मीर खोऱ्यात गुप्तचर संघटांनी हाय अॅलर्ट जारी केला असून लष्कराच्या जवानांनी शोध मोहीम सुरू केली आहे. २ जूनला ‘जंग-ए-बदार’च्या दिवशी म्हणजेच रमजानच्या १७ व्या दिवशी कश्मीर खोऱ्यात फिदाहीन हल्ला करण्याचा कट जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेने रचला आहे. गुप्तचर यंत्रणांनी लष्कराला व पोलीस दलाला सतर्कतेचा इशारा दिला आहे. घुसखोरी केलेल्या दहशतवाद्यांना शोधण्यासाठी जागोजागी शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. कश्मीर खोऱ्यातील हॉटेल्स व गेस्ट हाऊस तपासण्यात येत आहे. सीमा भागात देखील हाय अॅलर्ट जारी करण्यात आला आहे. असे लष्कराच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

# चंद्रपुरात गावगुंडाकडून महिलेला विवस्त्र करुन मारहाण

**चंद्रपूर (गजानन पार्दे)-** चंद्रपूर जिल्ह्यात क्षुल्लक कारणावरुन वाद झाल्याने एका गावगुंडाने शेजारी राहणाऱ्या महिलेला विवस्त्र करुन भर चौकात बेदम मारहाण केल्याची घटना उजेडात आली आहे. पोलिसांनी याप्रकरणी अदखलपात्र गुन्हा नोंद केला होता. मात्र श्रमिक एल्गार संघटनेने सत्य बाहेर आणल्यावर पोलिसांनी गुन्हे नोंद करत आरोपींना अटक केली. चंद्रपूरच्या मूल तालुक्यातील येरगाव आठवड्यापूर्वी ही घटना घडली. सात दिवसांपूर्वी पीडित महिला आणि आरोपीची पत्नी यांच्यात क्षुल्लक वाद झाला होता. यानंतर आरोपी प्रभाकर नागपुरेने वादात उडी



घेत, आपल्या पुतण्यासह पीडित महिलेच्या घरी धुडगूस घातला. या महिलेला फरफटत मुख्य चौकात आणलं आणि विवस्त्र करुन बेदम मारहाण केली.संपूर्ण गावाने ही घटना पाहिली, मात्र गावगुंडांसमोर गावकरी हतबल झाले. अखेर पोलिस पाटलांनी घटनेची माहिती मूल पोलिस ठाण्याला दिली. पोलिसांनी या प्रकरणी अदखलपात्र गुन्हा नोंदवला.

# तारापूर अणुऊर्जा प्रकल्पाच्या वाहनांची स्थानिकांकडून तोडफोड

**पालघर (राकेश गायकवाड)-** पालघरमधील तारापूर अणुऊर्जा प्रकल्पात जाणाऱ्या वाहनांची स्थानिकांनी तुफान तोडफोड केली आहे. प्रकल्पग्रस्त, भूमीपुत्रांना प्रकल्पातील नोकऱ्यांपासून दूर ठेवल्याच्या संतापातून ही तोडफोड करण्यात आली आहे.तारापूर अणुऊर्जा प्रकल्पात भरती प्रक्रिया सुरु झाली आहे. प्रकल्प क्रमांक ३ आणि ४ मध्ये शेकडो तरुणांना नोकरीसाठी कॉल आले होते. त्यासाठी हे तरुण तारापूर इथे आले होते. परंतु भरती प्रक्रियेत अधिकाऱ्यांनी प्रकल्पग्रस्त आणि स्थानिकांना डावलून बाहेरच्या लोकांना भरती करुन घेतल्याचा आरोप आहे.याचा निषेध म्हणून शेकडो स्थानिक रस्त्यावर उतरले आणि प्रकल्पात जाणारी वाहनं अडवली. स्थानिकांनी सकाळी सहा वाजल्यापासून प्रकल्पात जाणारी वाहनंही रोखून धरली आहेत. शिवाय बसच्या काचाही फोडल्या.

